# फिनिक्समध्ये रंगले संजय उपाध्ये यांचे गप्पाष्टक

गप्पाटप्पा म्हंटल्या की सर्वसाधारणपणे चार मित्रमंडळी एकत्र जमलेली आहेत आणि हसणं खिदळणं चालू आहे असं चित्र आपल्या डोळ्यांसमोर येतं. पण गप्पाष्टक हा कार्यक्रम या सगळ्या अंदाजांना छेद देऊन जातो. संजय उपाध्ये आपल्या या कार्यक्रमात सलग अडीच तास एकटे हसवत असतात. पण हसवता हसवता अन्तर्मुख कधी करतात हे तुमचं तुम्हालाच कळत नाही.

काव्य, साहित्य, राजकारण, समाजकारण, संस्कृती, अध्यात्म, संगीत, आणि  विनोद हे आठ विषय स्थूलमानाने ठरवलेले असले तरी बाकी कुठल्याच विषयाला या कार्यक्रमात बंदी नाही. आपल्याकडच्या निष्क्रीय होत चाललेल्या सुशिक्षित मध्यमवर्गीय समाजाला खडबडून जागे करणे हा माझ्या कार्यक्रमाचा हेतू आहे असं नकळत स्वतः उपाध्येच म्हणतात आणि त्यांची ही तळमळ हा कार्यक्रम ऐकताना जाणवल्याशिवाय राहवत नाही.

१३ मे २००६ रोजी फिनिक्सच्या महाराष्ट्र मंडळात संपन्न झालेला गप्पाष्टक हा उपाध्येंचा ७८५ वा प्रयोग होता. या संख्येवरूनच कार्यक्रमाची लोकप्रियता लक्षात येईल. याचं मुख्य कारण म्हणजे या कार्यक्रमाला ठराविक असं स्क्रिप्टच नाही. उत्स्फूर्तता हाच या कार्यक्रमाचा मुख्य पाया असल्यामुळे तो कायम ताजातवानाच वाटतो. उपाध्ये व्यासपीठावरुन एकटेच बोलत असतात तरीदेखील ते प्रत्येक प्रेक्षकाला इतकं आपलंसं करून घेतात की ते फक्त आपल्याशीच गप्पा मारत आहेत असं प्रत्येकाला वाटत राहातं आणि प्रेक्षकांची दाद मिळते ती नेमक्या याच वेगळेपणाला. जवळजवळ दोन तास तुम्हाला हसवत ठेवणारं गप्पाष्टक शेवटचा अर्धा तास मात्र अन्तर्मुख करुन जातं. आ ई नोकरीला जाते म्हणून पाळणाघरात राहावं लागणाऱ्या छोटीची कविता असो किंवा सुख म्हणजे नक्की काय हा विचारलेला प्रश्न असो आपण आपल्याही नकळत या प्रश्नांची उत्तरं शोधायला लागतो.

या कार्यक्रमाच्या निमिताने एकपात्री कार्यक्रमाचं एक वेगळं रूप बघायला मिळालं  आणि म्हणूनच हे गप्पाष्टक फिनिक्सवासियांच्या कायम स्मरणात राहिल हे नक्की.

--- नेत्रा अग्निहोत्री